'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

16

# २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीचे विश्लेषण

प्रा. शरद अर्जून वाघ
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला, विज्ञान व वणिज्य महाविद्यालय,
मनमाड, ता. नांदगांव जि. नाशिक
Email – sharadwagh141@gmail.com

भारताच्या राजकिय प्रक्रियेत २०१४ निवडणूक अनेक कारणांसाठी वैशिष्ट्य पूर्ण अशीच मानावी लागेल. या निवडणूकीने भारताच्या राजकिय वातावरणात प्रचंड परिवर्तन घडवून आणले आहे यात दुमत नाही. स्वतंत्र भारतात जवळजवळ ६० वर्ष एकहाती सत्ता असलेल्या कॉंग्रेस पक्षाने या निवडणूकीत अक्षरश: पानीपत का झाले? लोकसभेत विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळविण्याइतक्याही जागा वैभवशाली इतिहास असलेल्या कॉंग्रेस पक्षाला मिळू नयेत याच्या इतकी वाइट गोष्ट कोणती असेल? राजकीय घराणेशाही, धोरण लकवा, पक्षश्रेष्ठींची रिमोट कंट्रोल व्यवस्था, मंत्रीमंडळातील भ्रष्टाचार, संघटनात्मक स्थरावर निर्माण झालेले दोष, सहकारी पक्षांचे कुरघोडीचे राजकारण, पक्षातील अंतर्गत गटांचे शह – काटशहाचे राजकारण, राजकीय अनुभव नसलेले राहुल गांधीचे नेतृत्व, जनमानसाशी तुटलेली नाळ व वरिष्ठ नेत्यांची बेजबाबदार वक्तव्ये यांसर्वांमध्ये याची उत्तरे आपणाला शोधावी लागतील. भारतीय जनता पक्षाला मोठा विजय मिळविण्यात यासर्व गोष्टींचा उपयोग झाल्याचे दिसते. गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, बिहार, छत्तीसगड या मोठया राज्यात कॉंग्रेसचे मोठे नुकसान झाल्याचे दिसते. कर्नाटक वगळता एकाही राज्यात कॉंग्रेस पक्षाला आपल्या जागा वाढवता आलेल्या नाहीत. ज्या सामाजीक आधारावर कॉंग्रेस पक्ष पारंपारिक रित्या निवडणूका जिंकत आला होता तो सामाजीक आधार या निवडणूकीत नष्ट झाला होता. मनरेगा, अन्नसुरक्षा यांसारख्या लोकप्रिय योजनांच्या आधारे निवडणूक जिंकण्यचे कॉंग्रेसचे प्रयत्न असफल ठरले. २०१४ च्या या निवडणूकीत तरुन मतदारांची संख्या १० कोटी ऐवढी प्रचंड होती पण तरुन मतदारांना आकर्षीत करणे कॉंग्रेसला जमले नाही.

भारतीय जनता पक्षाने या निवडणूकीत मोठया प्रमाणावर सोशल मिडियाचा वापर करुन तरुनांना आकर्षीत केले. आपल्या हायटेक प्रचार यंत्रणेचा अतिशय समर्पक वापर त्यानी करुन घेतला. सोशल मिडियाच्या वापरातही कॉंग्रेस मागासलेलीच राहिली. कॉंग्रेसनी या निवडणूक प्रचारात गौरवशाली इतिहासाचा वापर केला तर भारतीय जनता पक्षाने उज्वल स्वप्न दाखवले. 'अच्छे दिन आनेवाले है', 'सौगंध है मुजे इस मिट्टी की, मै देश नही झुकने दुगा' यासारख्या जाहिरातींनी लोकांच्या अस्मीतेला हात घालून त्याचे मतदानात रुपांतर करणे भारतीय जनता पार्टीला खूपच फायद्याचे ठरले.

